CNR NO.MHSO200002315025

## नियमित दिवाणी दावा क्र. ७४/२०२५ मधील नि.१४ खालील आदेश

(जगन्नाथ भोसले वि. शिवाजी भोसले)

१. वादीतर्फे सदरचा अर्ज दावा मिळकतीसंदर्भात नि.क्र. ५ चे अंतिम आदेशापर्यंत जैसे–थे परिस्थिती ठेवून मिळणेबाबतचा दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन की, वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द मौजे चिकमहूद, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील जमीन गट नं. १०७८/१ या मिळकतीतील वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस यातील प्रतिवादी याने स्वतः अगर इतरामार्फत गैरहक्की हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतरची ताकीद मिळणेसाठीचा दावा नि.क्र.५ चे तुर्तातुर्त ताकीद अर्जासह दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्स बजावणी होऊन त्यांनी दि. १४.०२.२०२५ रोजी वकीलपत्र दाखल करुन कैफियत म्हणणे देणेकामी पुढील मुदत मागितलेली आहे. प्रतिवादी जाणीवपूर्वक म्हणणे देण्यास टाळाटाळ करीत आहेत. प्रतिवादी हे दरम्यानचे काळात वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करुन बांधकाम चालू करण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त ताकीद अर्जाच अंतिम निकाल लागेपावेतो दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये याकरिता स्थगिती आदेश देणे आवश्यक आहे. त्यामुळे नि.क्र.५ कडील अर्जाचे अंतिम निकालापावेतो प्रतिवादीविरुध्द स्थगिती आदेश मिळावेत याकरिता विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जास नि.क्र.१६ कडे आपले म्हणणे दाखल केले. त्यांच्या कथनाप्रमाणे वादीच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. प्रतिवादींना जुनी व महत्त्वाची कागदपत्रे अदयापही मिळाली नाहीत. प्रतिवादी यांना कैफियत दाखल

करण्यास दोन दिवसांची मुदत मिळावी. गुणागुंणावर कामकाज चालण्यास न्यायालयास निर्णय देणे सोयीचे होणार आहे. वादींची नि.क्र.५ कडील मागणी तीच आहे. त्यामुळे सदर कामी गुंतागुंत होणार आहे. सबब, अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज वाचला. प्रतिवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी याने सदरचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत अतिक्रमण करुन नव्याने घराचे बांधकाम करु नये, अशी विनंती केली आहे. सदर कामी वादीने तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जात देखील वादीची प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत नवीनपणे घराचे बांधकाम करु नये, अशी मागणी केली आहे. वादीच्या अर्जातील कथने पाहिली असता प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये नव्याने बांधकाम करत असल्याचे कथन केले आहे. वादीने अर्जातील कथनांच्या पुष्टयार्थ स्वतःचे शपथपत्र नि.क्र.१५ कडे दाखल केले आहे. वादींनी बांधकामाबाबत पुरावा दाखल केलेला नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीमध्ये बांधकाम झाल्यास दाव्याचा तसेच तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा हेतू नष्ट होणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये दावा मिळकतीसंदर्भात वादी प्रतिवादी यांना जैसे–थे – आदेश पारित करणे योग्य होईल. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास दावा मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा हेतू संपुष्टात येणार आहे. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करते.

CNR NO.MHSO200002315025

## आ दे श

१. वादींचा नि.१४ कडील अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. वादी व प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत दावा मिळकती सदंर्भात जैसे–थे परिस्थिती ठेवावी.

दिनांक–०३.०३.२०२५
स्थळ–सांगोला

(के.बी.सोनवणे)
२ रे सह.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
सांगोला